## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज मुंबई मेट्रो लाईन ३ च्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन

**मुंबई, ४ ऑक्टोबर,२०२४ :** बहुप्रतिक्षित कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो लाईन ३, या मुंबईच्या पहिल्या पूर्णत: भूमिगत मेट्रो मार्गिकेवरील पहिल्या टप्प्याचे उद्घाटन मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या ५ ऑक्टोबर २०२४ (शनिवार) रोजी होणार आहे. प्रधानमंत्री ठाणे येथे सुमारे विविध नागरी विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. यामध्ये 'आरे जेव्हीएलआर ते बीकेसी' या मेट्रो ३ च्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन होणार आहे. हा प्रकल्प मुंबईतील शहरी वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

राज्यपाल श्री. सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार आणि ऊर्जा मंत्री श्री मनोहर लाल, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे.

ठाणे येथील नियोजित कार्यक्रमानंतर मा. प्रधानमंत्री बीकेसी मेट्रो स्टेशनवर लाइन ३ च्या उद्घाटन समारंभासाठी पोहोचतील. यानंतर ते बीकेसी ते सांताक्रूझ मेट्रो स्थानकापर्यंत मेट्रो प्रवासाचा अनुभव घेतील आणि बीकेसीला परत येतील. प्रवासादरम्यान मेट्रो मध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चे लाभार्थी आणि विद्यार्थी, मजूर यांच्याशी ते संवाद साधणार आहेत.

दरम्यान प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी हे मेट्रो कनेक्ट३ या मेट्रो सेवा 'मोबाइल ॲप'चे लोकार्पण करतील हे ॲप नवीनतम वैशिष्ट्यांसह प्रवासाचा अनुभव वाढविण्यासाठी तयार केलेले आहे. तसेच मेट्रो ३ प्रकल्पावर आधारित 'कॉफी टेबल बुक'चे अनावरणही त्यांच्या हस्ते केले जाईल. यामध्ये भूमिगत मेट्रो प्रवासाच्या नेत्रदीपक फोटोंचा संग्रह आहे

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे यांनी यासंदर्भात सांगितले की, "मुंबईकरांसाठी उद्याचा दिवस महत्त्वाचा आहे. माननीय प्रधानमंत्री मेट्रो लाईन ३ चे उद्घाटन करत आहेत याचा आम्हाला सन्मान वाटतो. मुंबईकरांना जलद, सुखद प्रवास अनुभवता येणार आहे. मला विश्वास आहे की, मेट्रो ३ प्रकल्प मुंबईसाठी मैलाचा दगड ठरणार असून ही मेट्रो मुंबईकरांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणार आहे."

**For further information please contact: -**

**Vaidehi Khadse** — **9028543087** — **vaidehi.more@mmrcl.com**

**Niti Tamse** — **8369727364** — **niti.tamse@mmrcl.com**